CCE-II-RR/PR/PF/NSR/NSPR(A)/888/4055

**A**

ಜೂನ್ 2024 ರ ಪರೀಕ್ಷೆ - 2
**JUNE 2024 EXAMINATION - 2**

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]

Total No. of Printed Pages : 12 ]

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 38 ]

Total No. of Questions : 38 ]

**CCE RR/PR/PF/ NSR/NSPR FULL SYLLABUS**

Question Paper Serial No.

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **85-M**

**Code No. : 85-M**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ

## Subject : SOCIAL SCIENCE ( समाज विज्ञान )

**( ಮರಾಠಿ ಮಾಧ್ಯಮ / Marathi Medium )**

**( ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. / ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**

**( Regular Repeater / Private Repeater / Private Fresh / NSR / NSPR )**

ದಿನಾಂಕ : 22. 06. 2024 ] [ Date : 22. 06. 2024

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-15 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-15 A.M. to 1-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80 ] [ Max. Marks : 80

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

**Cut here /** ಇಲ್ಲಿ ಕತ್ತರಿಸಿ

1. प्रश्नपत्रिकेमध्ये 38 प्रश्न आहेत.
2. प्रश्नपत्रिका ही विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती प्रश्नपत्रिका उघडावयाची आहे. **( बाणाच्या खुणेच्या ठिकाणातून कापून प्रश्नपत्रिका उघडा )** डाव्या बाजूने कापून प्रश्नपत्रिका उघडू नका. प्रश्नपत्रिकेमधील सर्व प्रश्न असलेली पाने व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पहा.
3. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या ही त्या प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शविते.
5. प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.
6. तुम्हाला देण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) आणि तुमच्या प्रवेशपत्रावर छापलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) दोन्ही एकच आहे. याची खात्री करुन घ्या.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
प्रश्नपत्रिका येथून कापून उघडा.

**22. 06. 2024**

**Tear here**

**I. खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा :** **8 × 1 = 8**

1. कायम जमीनदारी पद्धत याने लागू केली.

   (A) वॉरन हेस्टींग (B) कॉर्नवालिस

   (C) वेलस्ली (D) डलहौसी

2. दुसऱ्या अँग्लो म्हैसूर युद्धाचे मुख्य कारण हे होते.

   (A) ब्रिटिशानी 'माहे' जिंकून घेतले.

   (B) ब्रिटिशानी श्रीरंगपट्टणच्या तहातील अटींचे उल्लंघन केले.

   (C) ब्रिटिशांनी कारवार आणि कोईमतूर आपल्या ताब्यात घेतले.

   (D) ब्रिटिशांनी मंगळूरच्या तहातील अटींचे उल्लंघन केले.

3. जागतीक आरोग्य संघटनेचे मुख्य कार्यालय या ठिकाणी आहे.

(A) न्यूयॉर्क

(B) पॅरिस

(C) रोम

(D) जिनेव्हा

4. भारताचे चहाचे बंदर हे आहे –

(A) विशाखापट्टणम्

(B) मार्मगोवा

(C) कोलकत्ता

(D) मुंबई

5. घटनेच्या 17 व्या कलमाचे महत्व हे आहे.

(A) बालमजुरी प्रतिबंध / नियंत्रणासाठी

(B) अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी

(C) निरक्षरतेच्या निर्मूलनासाठी

(D) हुंडा प्रतिबंध / नियंत्रणासाठी

6. नर्मदा बचाव आंदोलनाचे नेतृत्व केलेले –

(A) बाबा आमटे आणि मेधा पाटकर

(B) सुंदरलाल बहुगुणा आणि चंडीप्रसाद भट्ट

(C) डॉ. शिवराम करांत आणि कुसुमा सोरब

(D) कर्वे आणि शामजी कृष्णवर्मा

7. भारतातील हरित क्रांतीचे जनक –

(A) वर्गीस कुरीयन

(B) डॉ० एम० एस० स्वामीनाथन

(C) अमार्त्य सेन

(D) डॉ० नॉर्मन बोरलाग

8. रमेशला पाच वर्षाची एक मुलगी आहे. त्याला भविष्यासाठी आपल्या मुलीच्या लग्नाला रक्कम ठेवायची आहे, तर त्याला हे बँक खाते उपयोगाचे ठरते.

(A) बचत खाते.

(B) चालू खाते.

(C) आवर्ती ठेव खाते.

(D) मुदत ठेव खाते.

**II. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात / शब्दात उत्तरे लिहा : 8 × 1 = 8**

9. 'सत्यार्थ प्रकाश' हे पुस्तक कोणी लिहिले ?

10. इलबर्ट विधेयकाचा मुख्य उद्देश काय होता ?

11. सामाजिक स्तर कसा निर्माण होतो ?

12. निःशस्त्रीकरण म्हणजे काय ?

13. पेट्रोलला 'द्रवरुप सोने' असे का म्हणतात ?

14. पावसाचे पाणी साठविण्याची गरज का आहे ?

15. ''सत्तेचे विकेंद्रीकरण'' म्हणजे काय ?

16. जिल्हा औद्योगिक केंद्रे का स्थापन करण्यात आली ?

III. **खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन ते चार वाक्यात / मुद्यात उत्तरे लिहा :** **8 × 2 = 16**

17. राष्ट्रकुल संघ ( कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स ) ची स्थापना का झाली ?

**किंवा**

आम्ही नफेबाजी कशी नियंत्रीत करू शकतो ?

18. अप्पीको चळवळीचे वर्णन करा.

**किंवा**

बालविवाहाचे परिणाम वर्णन करा.

19. पहिल्या जागतिक महायुद्धाचे परिणाम काय झाले ?

20. जुनागढ संस्थान भारतीय संघराज्यात कसे विलिन करण्यात आले ?

21. सध्याच्या वर्षात मातीची धूप वाढत आहे. का ?

22. भारतीय शेतीही मान्सूनचा जुगार आहे. समर्थन करा.

23. सार्वजनिक अर्थव्यवस्था ही वैयक्तीक अर्थव्यवस्था पेक्षा वेगळी आहे. कशी ?

24. प्रत्येकवर्षी 15 मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. का ?

**IV. खालील प्रश्नांची प्रत्येकी सहा वाक्यात / मुद्यात उत्तरे लिहा :** **9 × 3 = 27**

25. चौथा कृष्णराज वडेयर यांच्या शासन काळात म्हैसूर राज्य आदर्श राज्य बनले. या वाक्याचे समर्थन करा.

**किंवा**

भारतातील सामाजीक सुधारणात राजाराम मोहन रॉय यांची भूमिका लक्षात ठेवण्यासारखी आहे. या वाक्याचे समर्थन करा.

26. जमिनीच्या वापरावर परिणाम करणाऱ्या घटकांची यादी तयार करा.

**किंवा**

भारताच्या औद्योगिक प्रदेशांची यादी तयार करा.

27. ग्रामीण विकासात पंचायत राज संस्था महत्वाची भूमिका बजावीते. सिद्ध करा.

**किंवा**

भारताच्या विकासात पंच वार्षिक योजना महत्वाची भूमिका बजाविते. कसे ?

28. बँकेची कार्ये काय आहेत ?

**किंवा**

उद्योजकांचे कार्ये काय आहेत ?

29. सहाय्यक सैन्य पद्धतीतील अटी काय आहेत ?

30. प्लासीच्या लढाईची कारणे आणि परिणाम वर्णन करा.

31. अनेक संदर्भात राशियाने भारताला सहकार्य केले आहे. कसे ?

32. बेरोजगारी समस्येवर उपाय काय आहेत ?

33. अरण्य संरक्षणाच्या पद्धतींचे वर्णन करा.

**V. खालील प्रश्नांची प्रत्येकी आठ वाक्यात / मुद्यात उत्तरे लिहा : 4 × 4 = 16**

34. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील जहालमतवादींची भूमिका वर्णन करा.

**किंवा**

भारतातील ब्रिटिश शिक्षण पद्धतीचे परिणाम वर्णन करा.

35. भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध पुष्कळ कारणांमूळे अपयशी ठरले. या वाक्याचे समर्थन करा.

36. महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी सरकारने कोणते उपाय हाती घेतले आहेत ?

37. भूकंपाची कारणे आणि त्याचे परिणाम लिहा.

**VI.** 38. **भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि त्यामध्ये खालील ठिकाणे दाखवा :**

**1 + 4 = 5**

a) $23\frac{1}{2}^{\circ}$ उत्तर अक्षांश

b) कोंकण किनारपट्टी

c) हिराकूड योजना

d) अमृतसर

**फक्त अंध विद्यार्थ्यांसाठी पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 38 च्या एवजी )**

नदि खोऱ्यातील बहुउद्देशीय योजनेचे प्रमुख उद्देश लिहा. **5**

DO NOT WRITE ANYTHING HERE